06-08-2022-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 09/06/2022 12:28 AM Page 1

'दायकीन इंडिया'चे पणजीत नवे कार्यालय

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ५ : एचव्हीएसी उद्योगातील अग्रणी कंपनी असलेल्या दायकीन इंडियाने गोव्यातील नव्या कार्यालयाचे उदघाटन केले. नेवगीनगर–मळा येथील गेरा इम्पिरियम येथे हे नवे कार्यालय असून दिमाखदार पद्धतीने हा कार्यक्रम झाला. या नव्या कार्यालयात ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी विक्री, सेवा, तांत्रिक आधार व इतर आधार कार्ये करणाऱ्या सर्व विभागांना एकाच ठिकाणी समाविष्ट करण्यात आले आहे. दायकीन ग्लोबलकडील भक्कम तंत्रज्ञान दायकीन उत्पादनांना ग्राहकांपर्यंत पोहोचवले जाईल, असा विश्वास यावेळी कंपनीने व्यक्त केला. गोवा हे आमच्यासाठी एक चांगले गुंतवणूक करता येणारे मार्केट आहे व आम्ही ते गुंतवणुकीने विकसित करणार आहोत, असे या वेळी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. ग्राहकांसाठी अनेक नवी उत्पादने तयार केली जात असून व्यवसायाचा विस्तार जोरात चालू असल्याचे त्यांनी पुढे सांगितले.

दायकीन इंडियाने हल्लीच आंध्रप्रदेशातील श्री सिटी येथे एअर कंडिशनर्स व त्यांचे घटकांच्या उत्पादनासाठी केंद्र सरकारच्या पीएलआय योजनेखाली मोठी जमीन खरेदी केली आहे. पहिल्या टप्प्यातच सुमारे एक हजार कोटींची गुंतवणूक कंपनी करणार आहे व त्याशिवाय राजस्थानमधील नीमराणा येथे पाचशे कोटींच्या गुंतवणुकीने संशोधन व विकास युनिट विकसित केले जात आहे. उद्घाटन प्रसंगी दायकीन चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कंवलजीत जावा यांनी सांगितले की, गोवा हे आमचे आवडते ठिकाण असून येथील ग्राहक चांगले आहेत. येथील मार्केट किमान २५ टक्के घेण्याचे आमचे लक्ष्य आहे व आम्ही ग्राहकांना उच्चतम सेवा आमच्या प्रशिक्षित तांत्रिक कर्मचाऱ्यांद्वारे देत आहोत. दायकीन इंडस्ट्रीज लि. ची दायकीन एअरकंडिशनिंग इंडिया परा. लि. ही संलग्न कंपनी असून घरगुती व व्यावसायिक वापरासाठी एअर कंडिशनिंग सिस्टीम्समध्ये आम्ही अनेक उत्पादनांसह अग्रणी कंपनी आहोत. भारतात व गोव्यात एअर कंडिशनर्स वापरण्याचे प्रमाण दोन्ही स्तरांवर वाढत आहे, व ही एक सजग ग्राहक असल्याची खूण आहे. गोवा व गोमंतकीय ग्राहक आम्हाला नेहमीच साथ देतील, असा आम्हास विश्वास वाटतो.

पान १ वरून

काटेबायणात भरदुपारी निर्घृण खून

त्यांच्यामध्ये शाब्दिक वाद सुरू झाल्यावर त्या चौघाजणांनी उमेश याला उड्डाण पुलाखाली नेले. तेथे खाली पाडल्यावर एका संशयिताने पाठीवर कोयत्याने वार केला. त्यानंतर इतरांनी त्यांच्याकडे असलेल्या हत्याऱ्यांनी वार केले. धारदार कोयते व चाकूचे वार झाल्याने उमेश तेथेच गंभीर जखमी होऊन पडला. अशोक याने उमेश याला सोडविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्याला धमकी देण्यात आल्याने तसेच त्या हल्लेखोरांच्या हातात हत्यारे पाहताच अशोक तेथे लपला. त्याने या घटनेची माहिती उमेश याच्या भावाला दिली. उमेश याचा भाऊ विजय हा तेथे कार घेऊन येईपर्यंत त्या हल्लेखोरांनी घटनास्थळाहून पळ काढला. उमेश याला उपचारासाठी त्या कारमध्ये घालण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या उमेशाला उपचारासाठी चिखली उपजिल्हा इस्पितळामध्ये नेण्यात आले. परंतु त्याला तेथे डॉक्टरांनी मृत घोषित केले. उमेश याच्या शरीरावर धारदार हत्याऱ्यांचे काही वार झाल्याचे उघड झाले.

याप्रकरणी पोलिसांनी माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहचले. तपास करताना पोलिसांना उमेश याच्या खुनासाठी वापरण्यात आलेले दोन कोयते, संशयितांची चप्पल व इतर वस्तू तेथे पोलिसांना मिळालेत. ते ताब्यात घेण्यात आले. ही माहिती मिळताच वास्कोचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजेश कुमार, मुरगावचे पोलिस निरीक्षक राघोबा कामत, वास्कोचे निरीक्षक कपिल नायक, वेर्णाचे पोलिस निरीक्षक डायगो ग्रासियस तसेच फोरेन्सिक पथक तेथे पोहचले. हा खुनाची घटना पूर्ववैमनस्यातून घडल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजेश कुमार यांनी सांगितले. मयत उमेश हा काटेबायणा येथे बार चालवीत होता. बायणातील हाउसिंग कॉलनीमध्ये उमेश राहतो. त्याच्यामागे पत्नी आहे.

विरोधी पक्षनेता १३ पर्यंत जाहीर होणार

मला आमदार मायकल लोबो यांच्या नवी दिल्ली भेटीची माहिती नव्हती. माध्यमांद्वारे लोबो यांच्या दिल्ली भेटीची माहिती मिळाल्याचेही पाटकर म्हणाले.

पाटकर यांनी सांगितले की, मायकल लोबो आणि दिगंबर कामत हे दोन काँग्रेसचे आमदार वगळता सर्व काँग्रेस आमदारांच्या मी संपर्कात आहे आणि आम्ही सर्व एकत्र आहोत. काँग्रेस पक्षाचे आमदार पक्षासोबत कमी प्रमाणात दिसून येत असल्याचे आमदारांमध्ये अस्थिरता आहे का, असे विचारले असता ते म्हणाले की पक्ष स्थिर होता आणि स्थिर आहे.

अमली पदार्थप्रकरणी ब्रिटीश नागरिकाला अटक

पेडणे पोलिसांनी पंचनामा केला आणि सर्व ड्रग्ज जप्त केले आणि एनडीपीएस कायद्याच्या कलम २० (बी) (ळळ) (ए) आणि २२ (सी) अंतर्गत गुन्हे नोंदवले आणि संशयितांना अटक केली. संपूर्ण छापा एसडीपीओ सिद्धांत शिरोडकर यांच्या देखरेखीखाली आणि एसपी उत्तर शोभित सक्सेना यांच्या संपूर्ण देखरेखीखाली घेण्यात आला.

अमली पदार्थप्रकरणी तिसऱ्या दिवशीही धरपकड

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ५ : अंमली पदार्थाचा व्यवसाय करणाऱ्या लहान माशांची धरपकड हणजूण पोलिसांकडून सुरू असून सलग तिसऱ्या दिवशी हणजूण पोलिसांनी एक ड्रग पेडलरला अटक करून त्याच्याकडून पंचवीस हजारांचा अंमली पदार्थ जप्त केला. ही कारवाई ५ रोजी सायंकाळी करण्यात आली.

आसगाव येथील गणपती देवळाजवळ अंमली पदार्थाची विक्री होणार असल्याची खबर मिळाल्यानंतर हणजूण पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक धीरज देविदास यांनी इतर पोलिस सहकाऱ्यासह उपअधीक्षक जिवबा दळवी व निरीक्षक प्रशाल देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी सापळा रचला असता सायंकाळी उशीरा नियाज अब्दुल कादर (२८) रा भोवतावाडो, आसगाव हा संशायस्पद रित्या घुटमळता आढळला. हणजूण पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडे ११.९ ग्राम वजनाचा चरस हा २५ हजार किंमतीचा अंमली पदार्थ सापडला. हणजूण पोलिसांनी अंमली पदार्थ जप्त करून कादर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्याखाली गुन्हा नोंद करून अटक केली.

हणजुण : अंमली पदार्थविरोधी कायद्याखाली अटक केलेल्या संशयितासह हणजूण पोलिस निरीक्षक प्रशाल देसाई, उपनिरीक्षक धीरज देविदास, उपनिरीक्षक साहिल वारंग व इतर सहकारी.

सहवेदना

द्वारकी गावस

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ५ : देऊळवाडा, वडलेभाट–कालापूर येथील द्वारकी गांगू गावस (८४) यांचे आज दुपारी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. अंत्यसंस्कार मंगळवार ६ रोजी सकाळी कालापूर स्मशानभूमीत करण्यात येतील. त्यांच्या मागे पुत्र मोहन, आनंद आणि महेश तसेच चार विवाहित कन्या, जावई, स्नुषा नातवंडे असा मोठा परिवार आहे.

कारवारचे माजी आमदार रामकृष्ण नाईक यांचे निधन

■ टीम दैनिक हेराल्ड

काणकोण, दि. ५ : सिद्धर, कारवार येथील कर्नाटकाचे माजी मंत्री आणि सतत तीन वेळा कारवार मतदारसंघाचे आमदार राहिलेले प्रभाकर सदाशिव राणे (वय ८०) यांचे आज दुपारी निधन झाले. उद्या सकाळी सिध्दर येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात येईल, असे कारवारचे वकिल ॲड. रामकृष्ण नाईक यांनी सांगितले.

स्व. राणे १९८३, १९८५ व १९८९ असे सलग तीन वेळा कारवार मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीवर निवडणूक लढवून निवडून आले. १९९४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत वसंत अस्नोटीकर यांनी कर्नाटक काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीवर त्यांना पराभूत केले. ते निवृत्त शिक्षक होते.

कुळे येथे घरात चोरी

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ५ : कुळे येथे रविवारी रात्री शिला वेरेकर आणि शब्बीर मुल्ला यांच्या घरात प्रवेश करून अज्ञातांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. अज्ञात चोरट्यांनी मुख्य दरवाजा तसेच कपाटाची कुलूपे तोडून चोरीचा प्रयत्न केला. कुळे पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, शिलावरेकर व शब्बीर मुल्ला यांची घरे मुख्य रस्त्याच्या बाजूला आहे. रविवारी रात्री दोन्ही घरात कुणीच नसल्याची संधी साधून अज्ञातांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरात असलेल्या कपाट तसेच अन्य ठिकाणी किमती साहित्य शोधणाऱ्या अज्ञातांनी काहीच सापडले नाही. त्यामुळे अज्ञात चोरटे घरातील इतर साहित्य तिथेच ठेवून पळाले. काही महिन्यांपूर्वी शीला वेरेकर यांच्या घरात अज्ञातांनी चोरीचा प्रयत्न केला होता. सोमवारी सकाळी दोन्ही घरातील मंडळी घरी दाखल झाल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. कुळे पोलिसांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला.

दरम्यान, कुळे येथील जग प्रसिद्ध दूधसागर धबधब्यावर अंधोळ करताना भोपाळ येथील आर्थिक शुक्ला (३१) नामक पर्यटक पाण्यात बुडाला. सोमवारी दुपारी मित्रांसमवेत आर्थिक शुक्ला नदीवर अंधोळ करीत असताना बुडाल्याची माहिती कुळे पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच निरीक्षक संजीव दळवी यांनी घटनास्थळी धाव घेतली. संध्याकाळी उशिरा पर्यंत बेपत्ता पर्यटकांचा शोध कुळे पोलीस घेत होते.

खरेदी विक्री

For Sale 1 BHK, 2 BHK, Shops ready to move in Cuchulim Mapusa North Goa. Call 9673867500

पाहिजेत

Required Merchant Navy Ship Land Jobs M/F 10th to Graduate Diploma, Data Entry, Computer Operator, Captan, 2nd Officer. 3rd officer. Deck Cadet.Trainee G.p. Rating food Salary 25k + Facility. Send cv: maritimenationalacademy@gmail.com 7834821198/ 9717019466

Wanted counter sales boys and sales girls staying in and around Panjim. Contact No: 9011937381 / 9823013308

जाहीर सूचना

ICICI Bank | **शाखा कार्यालय** : आयसीआयसीआय बँक लि., गाळा क्र. २०१–बी, २रा मजला, रस्ता क्र. १, प्लॉट क्र. बी–३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र–४००६०४

खालील कर्जदार/कर्जदारांनी या बँकेकडून घेतलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल व व्याजाच्या परतफेडीमध्ये बुडवेगिरी केली आहे आणि हे कर्ज कार्यरत नसलेली मत्ता (नॉन परफॉर्मिंग असेट्स–एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहे. सदर कर्जदारास त्याच्या मागील ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायझशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट–२००२ च्या कलम १३(२) खाली एक नोटीस पाठवण्यात आली, तथापि तिची कार्यवाही झाली नाही व म्हणून याद्वारे या जाहीर सूचनेद्वारे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह–कर्जदार/हमीदार/(कर्जखाते क्रमांक) आणि पत्ता	सुरक्षित मत्ता/अंमलबजावणी करण्याची मत्तेचा मालमत्ता पत्ता	पाठवलेल्या नोटीशीची तारीख/नोटीस तारखेला देय रक्कम	एनपीए तारीख
१.	फूजा व्ही. सातार्डेकर/वासुदेव नामदेव सातार्डेकर, एलबीजीओए ००००२८७६७४९, फ्लॅट क्र. एस/३, २रा मजला, सोलसन्स रेसिडेन्सी, आल्त पर्वरी, उत्तर गोवा, एसबीआय वर्षा कॉलनीजवळ, बार्देश, गोवा, म्हापसा ४०३५२१.	प्लॉट क्र. १३ (बंगला), गव्हर्नमेंट कदंब एम्प्लॉईज सीएचएसएल, सर्व्हे क्र.४०/१/ए, कदंब पठार, चिंबल गाव, ता. तिसवाडी, जि. उत्तर गोवा, पणजी ४०३००१	दि. ८ ऑगस्ट २०२२ रु. १६,६९,४२५/–	०६/०४/२०२२

नोटीशीची पर्यायी सेवा देण्याकरिता पावले उचलली आहेत. वरील कर्जदार आणि/ किंवा त्यांचे हमीदार (लागू असेल तसे) यांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत देय रकमेचा भरणा करावा अन्यथा सिक्युरिटायझशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट–२००२ मधील तरतुदींनुसार पुढची पावले उचलली जातील.

दिनांक : ०६ सप्टेंबर २०२२
ठिकाण : गोवा

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय बँक लिमिटेड

यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India | आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

क्षेत्रीय कार्यालय, एलआयसी बिल्डींग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो, पणजी, गोवा–४०३००१. दूर.क्र. – २४३७९७१/७२/७३/७४

ई–लिलाव विक्री सूचना | **स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

याद्वारे तमाम लोक आणि खासकरून कर्जदार आणि हमीदारांना नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाणवट केलेली/त्यांचा भार असलेली येथे खाली वर्णिलेली मालमत्ता जिचा रचनात्मक / भौतिक ताबा युनियन बँक ऑफ इंडियाचे (सुरक्षित धनको) प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला असून ती 'जसे आहे, जेथे आहे'', ''जे आहे, जे काही आहे'' आणि ''तेथे जे जे काही आहे'' या तत्वावर येथे खाली दिलेले कर्जदार व हमीदारांकडून युनियन बँक ऑफ इंडियाला येथे खाली दिल्यानुसार देय असलेल्या रकमेची वसुली करण्याकरिता ग्रेथे खाली दिलेल्या तारखेस विकल्या जातील. तसेच राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव येथे खाली दिलेल्या आहेत.

शाखेचे नाव आणि पत्ता	मडगाव शाखा, साळगावकर बिल्डींग, रुआ लुईस दी मिरांडा, मडगाव, सासष्टी, जि. दक्षिण गोवा, दूर. क्र. : ०८३२–२७०५४४८
कर्जदार व हमीदाराचे नाव	१) कर्जदार : मेसर्स मुक्तार ऑटोमोबाईल्स प्रा. लि. प्लॉट क्र. बी–२ बी–३, वेर्णा इंडस्ट्रियल इस्टेट, वेर्णा, गोवा प्रति, (२) हमीदार : १(अ) शेख शमसुद्दिन मुक्तार, प्लॉट क्र. २३–२४, हफिजामंझील, जीवोत्तम मठ मार्ग, वसंतनगर, घोगळ, मडगाव. १(ब) श्रीमती शमशून शेख, प्लॉट क्र. २३–२४, हफिजामंझील, जीवोत्तम मठ मार्ग, वसंतनगर, घोगळ, मडगाव. १(क) श्री. महिद शेख, प्लॉट क्र. २३–२४, हफिजामंझील, जीवोत्तम मठ मार्ग, वसंतनगर, घोगळ, मडगाव. १(ड) श्री. कस्टोडिओ सेबास्तिओ फर्नांडिस, फ्लॅट क्र. बी/२, सीडी नेबरहूड, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर, घोगळ, मडगाव, गोवा.

देय रक्कम **रु. : रु. २,१०,१६,९१४.९२/– (रु. दोन कोटी दहा लाख सोळा हजार नऊशे चौदा आणि पैसे ब्याण्णव फक्त)** अधिक एनपीए तारखेपासून कंत्राटी दराने व्याज आणि कायदेशीर व किरकोळ खर्च व किमती.

मालमत्ता वर्णन : पुढील मालमत्तांचा सर्व भाग - मालमत्ता क्र. १ : गोव्यातील तालुका व उपजिल्हा सासष्टीमधील सांत जुझे दी आरीयल गोवाच्या सर्व्हे क्र. १०४/१ खाली सर्वेक्षित सेंट जुझे दी आरीयल येथे असलेल्या ओर्नागिलीवेळी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेतील मॅक गार्डन्स स्कीममधील श्रीमती शेख शमसुद्दिन मुक्तार यांच्या मालकीचा ४०३ चौ.मी. क्षेत्रफळाचा प्लॉट क्र. ए–६१. मालमत्ता क्र. २ : गोव्यातील तालुका व उपजिल्हा सासष्टीमधील सांत जुझे दी आरीयल गोवाच्या सर्व्हे क्र. १०४/१ खाली सर्वेक्षित सेंट जुझे दी आरीयल येथे असलेल्या ओर्नागिलीवेळी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेतील मॅक गार्डन्स स्कीममधील श्रीमती शेख शमसुद्दिन मुक्तार यांच्या मालकीचा ५०० चौ.मी. क्षेत्रफळाचा प्लॉट क्र. बी–४७. मालमत्ता क्र.३ : गोव्यातील तालुका व उपजिल्हा सासष्टीमधील सांत जुझे दी आरीयल गोवाच्या सर्व्हे क्र. १०४/१ खाली सर्वेक्षित सेंट जुझे दी आरीयल येथे असलेल्या ओर्नागिलीवेळी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेतील मॅक गार्डन्स स्कीममधील श्री. शेख मुक्तार यांच्या मालकीचा ३६९.२५ चौ.मी. क्षेत्रफळाचा क्र. बी–६५. सुरक्षित धनकोस ज्ञात भार : कोणतेही अन्य भार ज्ञात नाहीत. ताब्याचा प्रकार : भौतिक. ई–लिलावाची तारीख व वेळ **:२१.०९.२०२२ सकाळी ११.०० ते संध्या. ५.००** (१० मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह). ई–लिलाव संकेतस्थळ : www.mstcecommerce.com राखीव किंमत : मालमत्ता क्र. १. : **रु. ३६,२७,०००/– (रु. छत्तीस लाख सत्तावीस हजार फक्त),** मालमत्ता क्र. २ : रु. ४५,००,०००/– (रु. पंचेचाळीस लाख फक्त), मालमत्ता क्र. ३ : **रु. ३३,२३,२५०/– (रु. तेहतीस लाख तेवीस हजार दोनशे पन्नास फक्त).** त्यापुढील बोली : सर्वोच्च बोली किंवा लगतच्या बोली मूल्यापेक्षा, जसे प्रकरण असेल त्यानुसार, जादा असलेली **रु. ५०,०००.०० (रु. पन्नास हजार फक्त)** पेक्षा कमी नसलेली असावी, व बहू वोली मूल्य वाढ रु. ५०,०००.०० (रु. पन्नास हजार फक्त) सह. बयाणा रक्कम ठेव : **मालमत्ता क्र. १ : रु. ३,६२,७००/ – (रु. तीन लाख बासष्ट हजार सातशे फक्त), मालमत्ता क्र. २ : रु. ४,५०,०००/–** (रु. चार लाख पन्नास हजार फक्त), **मालमत्ता क्र. ३ : रु. ३,३२,४००/– (रु. तीन लाख बत्तीस हजार चारशे फक्त).** ई–लिलाव चालू होण्याच्या तारखेला वा त्यापूर्वी. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी www.unionbankofindia.com या संकेतस्थळावर पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

शाखेचे नाव आणि पत्ता	मडगाव शाखा, साळगावकर बिल्डींग, रुआ लुईस दी मिरांडा, मडगाव, सासष्टी, जि. दक्षिण गोवा, दूर. क्र. : ०८३२–२७०५४४८
कर्जदार व हमीदाराचे नाव	**१. कर्जदार आस्थापन : मेसर्स क्वाड्रोस मोटो कॉर्प कं., ०३ रेवा अपार्टमेंट्स, मल्टीपर्पज स्कूलसमोर, बोर्डा, मडगाव, गोवा ४०३६०२.** **२. भागीदार कर्जदार आणि हमीदार : श्री. इव्हेन्सिओ ज्योकिम क्वाड्रोस,** **३. भागीदार कर्जदार आणि हमीदार : श्रीमती लिझेल क्वाड्रोस ऊर्फ लिझेल दी लिझी मेलो** **२ व ३ दोघेही राहणार घर क्र. ९८, मुग्रोपोल वेर्णा, सासष्टी, गोवा, मडगाव, गोवा ४०३७२२.**

देय रक्कम : रु. ३८,६१,२३८.००/– (एनपीए तारखेला देय रक्कम) अधिक एनपीए तारखेपासून कंत्राटी दराने व्याज आणि कायदेशीर खर्च.

मालमत्ता वर्णन : क्र. ४९ व ५० खाली मात्रिज रेकॉर्डमध्ये नोंदवलेली खंड बी–३४ च्या पृष्ठ ५२ च्या क्र. १२०५४ खाली भू नोंदणी रेकॉर्ड्समध्ये वर्णिलेली काकोडा गावाच्या क्र. १२८ पोटविभाग क्र. १ खाली सर्वेक्षित गोवा राज्याच्या दक्षिण गोवा जिल्ह्याच्या केपे तालुक्यातील काकोडा गावात असलेल्या बाणसाय कुटुंबण किंवा माडा बाणसाय घरभात या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेत बाणसाय प्लाझा को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. च्या एफ इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या गाळा क्र. जी–१, जी–२, जी–९ व जी–१० या स्थावर मालमत्तेचा संपूर्ण भाग. ताब्याचा प्रकार : **भौतिक. सुरक्षित धनकोस ज्ञात भार :** कोणतेही अन्य भार ज्ञात नाहीत. **ई–लिलावाची तारीख व वेळ :२१.०९.२०२२ सकाळी ११.०० ते संध्या. ५.००** (१० मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह). **ई–लिलाव संकेतस्थळ :** www.mstcecommerce.com राखीव किंमत :रु. ४३,२३,०००/– (रु. त्रेचाळीस लाख तेवीस हजार फक्त). त्यापुढील बोली : सर्वोच्च बोली किंवा लगतच्या बोली मूल्यापेक्षा, जसे प्रकरण असेल त्यानुसार, जादा असलेली रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) पेक्षा कमी नसलेली असावी, व बहू वोली मूल्य वाढ रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) सह. बयाणा रक्कम ठेव : रु. ४,३२,०००/– (रु. चार लाख बत्तीस हजार फक्त). ई–लिलाव चालू होण्याच्या तारखेला वा त्यापूर्वी. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी www.unionbankofindia.com या संकेतस्थळावर पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

शाखेचे नाव आणि पत्ता	मडगाव शाखा, साळगावकर बिल्डींग, रुआ लुईस दी मिरांडा, मडगाव, सासष्टी, जि. दक्षिण गोवा, दूर. क्र. : ०८३२–२७०५४४८
कर्जदार व हमीदाराचे नाव	**१. कर्जदार आस्थापन : मेसर्स एव्हेन्शिओ ज्योकिम क्वाड्रोस, ०३ रेवा अपार्टमेंट्स, मल्टीपर्पज स्कूलसमोर, बोर्डा, मडगाव, गोवा ४०३६०२. (२) प्रोप्रायटर कर्जदार : श्री. एव्हेन्शिओ ज्योकिम क्वाड्रोस, घर क्र. ९८, मुग्रोपोल वेर्णा, सासष्टी, गोवा, मडगाव गोवा ४०३७२२. (३) हमीदार : श्रीमती लिझेल क्वाड्रोस ऊर्फ लिझेल दी लिझी मेलो, घर क्र. ९८, मुग्रोपोल वेर्णा, सासष्टी, गोवा, मडगाव, गोवा ४०३७२२.**

देय रक्कम : रु. २७,६३,२१५.१७/– (एनपीए तारखेला देय रक्कम) अधिक एनपीए तारखेपासून कंत्राटी दराने व्याज आणि कायदेशीर खर्च.

मालमत्ता वर्णन : क्र. ४९ व ५० खाली मात्रिज रेकॉर्डमध्ये नोंदवलेली खंड बी–३४ च्या पृष्ठ ५२ च्या क्र. १२०५४ खाली भू नोंदणी रेकॉर्ड्समध्ये वर्णिलेली काकोडा गावाच्या क्र. १२८ पोटविभाग क्र. १ खाली सर्वेक्षित गोवा राज्याच्या दक्षिण गोवा जिल्ह्याच्या केपे तालुक्यातील काकोडा गावात असलेल्या बाणसाय कुटुंबण किंवा माडा बाणसाय घरभात या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ३१.५० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या बाणसाय प्लाझा को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. च्या ए इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या गाळा क्र. एस–१ या स्थावर मालमत्तेचा संपूर्ण भाग. ताब्याचा प्रकार : भौतिक. सुरक्षित धनकोस ज्ञात भार : कोणतेही अन्य भार ज्ञात नाहीत. ई–लिलावाची तारीख व वेळ :२१.०९.२०२२ सकाळी ११.०० ते संध्या. ५.०० (१० मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह). ई–लिलाव संकेतस्थळ : www.mstcecommerce.com राखीव किंमत **:रु. १८,२३,०००/–** (रु. अठरा लाख तेवीस हजार फक्त). त्यापुढील बोली : सर्वोच्च बोली किंवा लगतच्या बोली मूल्यापेक्षा, जसे प्रकरण असेल त्यानुसार, जादा असलेली **रु. २५,०००.००** (रु. पंचवीस हजार फक्त) पेक्षा कमी नसलेली असावी, व बहू वोली मूल्य वाढ **रु. २५,०००.००** (रु. पंचवीस हजार फक्त) सह. बयाणा रक्कम ठेव : **रु. १,८२,०००/–** (रु. एक लाख ब्याऐंशी हजार फक्त). ई–लिलाव चालू होण्याच्या तारखेला वा त्यापूर्वी. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी www.unionbankofindia.com या संकेतस्थळावर पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा

शाखेचे नाव आणि पत्ता	मडगाव शाखा, साळगावकर बिल्डींग, रुआ लुईस दी मिरांडा, मडगाव, सासष्टी, जि. दक्षिण गोवा, दूर. क्र. : ०८३२–२७०५४४८
कर्जदार व हमीदाराचे नाव	**कोकोनट ग्रूव्ह बीच रिसॉर्ट्स गोवा प्रा. लि., रावणवाडो बेतलभाटी, सासष्टी, दक्षिण गोवा, गोवा ४०३७१३.** **संचालक/हमीदार : १. श्री. श्रेयाम पियुष पटेल, फ्लॅट क्र. ६०, आदर्श सोसायटी,अठवल लाईन्स, सुरत, गुजरात ३९५००१.** **२. श्रीमती श्रुती अभिषेक देसाई, चाणक्यपुरी सोसायटी २, नाहा अलथान रोडजवळ, भालोर, सुरत, गुजरात.** **३. श्री. भारतभाई भुरभाई मावानी, १८ मणी निवास सौराष्ट्र कॉलनी, एलएच रोड, सुरत, गुजरात.** **४. श्री. भुपेंद्रकुमार भुरभाई पटेल, १८ मणी निवास सौराष्ट्र कॉलनी, एलएच रोड, सुरत, गुजरात.** **५. श्री. पियुषभाई लालजीभाई पटेल, फ्लॅट क्र. ६०, आदर्श सोसायटी, अठवल लाईन्स, सुरत, गुजरात ३९५००१.** **६. श्री. सरस्वतीबेन पियुषभाई पटेल, फ्लॅट क्र. ६०, आदर्श सोसायटी, अठवल लाईन्स, सुरत, गुजरात ३९५००१.**

देय रक्कम : रु. १०३८७०६४.४०/– (रु. एक कोटी तीन लाख सत्त्याऐंशी हजार चौसष्ट व पैसे चाळीस फक्त) अधिक एनपीए तारखेपासून कंत्राटी दराने व्याज आणि कायदेशीर खर्च.

मालमत्ता वर्णन : ६८१ चौ.मी. क्षेत्रफळ असलेली सध्या बेतलभाटी गावाच्या नवीन सर्व्हे क्र. ८७/१० एच खाली सर्वेक्षित आणि मात्रिज क्र. ५८० व ५६६ खाली महसूल कार्यालयात नोंदवलेली व नवीन मालिका क्र. १०९ खंड बी च्या १२८च्या मागील पृष्ठावर क्र. ४२२४२ खाली सासष्टी भूनोंदणी कार्यालयात वर्णिलेली गोवा राज्याच्या दक्षिण गोवा जिल्ह्याच्या बेतलभाटीमधील दांडो पोकवाडो या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमीन मालमत्ता व सुमारे ५४४.६६ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम क्षेत्रासह कोकोनट ग्रूव्ह बीच रिसॉर्ट (गोवा) प्रा. लि., घर क्र. ४३/ई(१), ४३/ई(२) या जमीन मालमत्ता व इमारतीसहितच्या मालमत्तेचा संपूर्ण भाग.
ताब्याचा प्रकार : भौतिक. **सुरक्षित धनकोस ज्ञात भार :** कोणतेही अन्य भार ज्ञात नाहीत. ई–लिलावाची तारीख व वेळ **:२१.०९.२०२२ सकाळी ११.०० ते संध्या. ५.००** (१० मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह). ई–लिलाव संकेतस्थळ : www.mstcecommerce.com राखीव किंमत : **रु. १८,२३,०००/– (रु. अठरा लाख तेवीस हजार फक्त).** त्यापुढील बोली : सर्वोच्च बोली किंवा लगतच्या बोली मूल्यापेक्षा, जसे प्रकरण असेल त्यानुसार, जादा असलेली **रु. ५०,०००.०० (रु. पन्नास हजार फक्त)** पेक्षा कमी नसलेली असावी, व बहू वोली मूल्य वाढ **रु. ५०,०००.०० (रु. पन्नास हजार फक्त)** सह. बयाणा रक्कम ठेव : **३२०,००,०००.००/– (रु. तीन कोटी वीस लाख फक्त).** ई–लिलाव चालू होण्याच्या तारखेला वा त्यापूर्वी.

दिनांक : ०५.०९.२०२२
ठिकाण : पणजी, गोवा

प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१)/ नियम ६(२) खाली सांविधिक ३०/१५ दिवसांची विक्री सूचना

ही नोटीस वर दिलेल्या तारखेस ई–लिलाव विक्री आयोजित करण्यासंबंधी सदर कर्जाचे कर्जदार व हमीदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६), नियम ६(२) व नियम ९(१) च्या तरतुदींखाली दिलेली नोटीस समजावी. इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, बोलीदारांनी ई–लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी व त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती पाहण्याकरिता https://www.ibapi.in आणि www.unionbankofindia.co.in tenders या संकेतस्थळाला भेट द्यावी.

फिनिक्स टाऊनशीप लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय :दुर्गाभवन, हेदे सेंटर, टोंक, पणजी, गोवा